स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील राज्यशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी करावयाचा शोध प्रबंधाचा संक्षिप्त

संशोधन आराखडा

"जिल्हा परिषदेतील महिला नेतृत्वाचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ परभणी जिल्हा)"

संशोधक

गणेश मारोती कचरे

एम.ए.एम,फिल.सेट (राज्यशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ.साहेब राठोड

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

स्व.नितीन कला व विज्ञान महाविद्यालय, पाथरी जी. परभणी

जुलै -२०१९

जिल्हा परिषदेतील महिला नेतृत्वाचा चिकित्सक अभ्यास
(विशेष संदर्भ परभणी जिल्हा)

प्रस्तावना :

सत्ता निम्न स्तरापर्यंत पोहचविणे हे लोकशाहीचे उदिष्ट असते. या करीता भारतासारख्या मोठया लोकसंख्या असणाऱ्या देशात सत्तेचे विकेंद्रीकरण हे आवश्यक असते. स्थानिक जनतेला स्थानिक प्रश्नाची जाण असल्याने ते स्थानिक प्रश्न चांगल्या प्रकारे सोडवू शकतात. म्हणुन भारतात ग्रामीण विकास घडवुन आणन्यासाठी स्थानिक कारभार स्थानिक जनतेच्या हातात देण्यात आलेला आहे. आर्ध्या महिला आर्धी सत्ता या आधारावर महाराष्ट्र शासनाने पुरुषाच्या बरोबरीने महिलाना देखील स्थानिक स्वराज्य संस्थेत सहभागी करुन घेण्यासाठी "महाराष्ट्र अधिनियम २०११" अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थेत ५० टक्के आरक्षण दिले आहे. ऐवडेच नाही तर महिलांच्या सक्रिय सहभागा करीता विशेष महिला सभा तसेच ध्वजारोहन सारख्या महत्वाच्या कार्यात महिलाना अग्रक्रम दिला आहे. ग्रामीण विकासाचा भार महिलांच्या खांदयावर टाकला आहे.

लोकशाहीची पाळेमुळे ग्रामीण भागात खोलवर रुजविण्यासाठी महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थातील सहभाग विशेष महत्वाचा आहे. आपल्या पारंपारीक व्यवस्थेत स्त्रीयांवर अनेक बंदने लादण्यात आली. त्यांना पुरुषांपेक्षा दुय्यम स्थान देण्यात आले. परंतु महाराष्ट्र अधिनियम २०११ ने महिलाना स्थानिक स्वराज्य संस्थेत ५० टक्के आरक्षण दिल्याने त्यांच्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला आहे. राजकीय सहभागाने महिलांचा आत्मविश्वास उंचावण्यास देखील मदत झाली आहे. सत्तेत आर्ध्या वाटेकरी झाल्याने ग्रामीण विकासात त्यांची भुमीका महत्वाची झाली आहे. स्त्रीयांच्या राजकीय सहभागाने ग्रामीण भागाच्या आर्थिक उन्नतीला देखील हातभार लागला आहे. बचत गटासारख्या माध्यमातुन त्या महिलांना उद्योग व्यवसाया करीता प्रोत्साहीत करत आहेत. समाज जागृतीचे कार्य करत आहेत. अनिष्ट रुढी परंपरा, अंधश्रधा, व्यसनाधीनता या विरोधात आवाज उठवुन सत्तेचा

उपयोग विधायक कार्या करीता करत आहेत. या संशोधनात परभणी जिल्हयातील महिलांच्या नेतृत्वाचा विशेषत:परभणी जिल्हा परिषदेतील महिला नेतृत्वाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र अधिनियम २०११ ने स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना देण्यात आलेल्या ५० टक्के आरक्षणामुळे सामाजीक जीवनात संस्थात्मक समानता, गुणवत्ता यामध्ये सुवर्णमध्ये साधण्याचे काम केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था व ग्रामीण विकास याचा दृढ संबंध आहे. ग्रामीण भागाच्या विकासात स्थानिक स्वराज्य संस्थाचा उच्च स्थर म्हणुन जिल्हा परिषदेची महत्वाची भुमीका आहे. म्हणुन ५० टक्के आरक्षणाने परभणी जिल्हा परिषदेतील महिलांच्या सहभागाचे महत्व अन्यन साधारण आहे. बराच काळ राजकीय, सामाजीक, आर्थिक, मानसशास्त्री आणि शैक्षणीक कारणामुळे भारतात महिलांची उपेक्षा करण्यात आलेली आहे. त्याचा परिपाक म्हणुन महिलांचा राजकीय सहभाग कमी राहीलेला आहे. आर्धी लोकसंख्या आसताना देखील महिलांची अवस्था अल्पसंख्य समुदाया सारखी राहत आलेली आहे. या पार्श्वभुमीवर ७३ व्या घटना दुरुस्तीने महिलांना १/३ आरक्षण देण्यात आले. त्या नंतरचा क्रांतीकारी निर्णय म्हणजे महाराष्ट्र अधिनियम २०११ ने महिलाना देण्यात आलेले ५० टक्के आरक्षण होय. महिलांच्या राजकीय सहभागात महाराष्ट्र अधिनियम २०११ ने कशा प्रकारचा बदल झाला हे समजुन घेण्याची आवश्यक्ता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना देण्यात आलेले ५० टक्के आरक्षण हे भारतीय लोकशाहीचा पाया मजबुत करणारा निर्णय आहे. लोकशाही शासनात लोकांच्या सहभागाला महत्वाचे स्थान असल्याने सन २०११ मध्ये महिलांना देण्यात आलेल्या ५० टक्के आरक्षणामुळे महिलांच्या राजकीय स्थितीत फार मोठा बदल झालेला आहे. या अनुषंगाने महिलांच्या बाबतीत झालेला सत्तास्थानातील ५० टक्के आरक्षणामुळे महिला नेतृत्वाची भुमिका व जबाबदारीचे भाण या अनुषंगाने अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाची आवश्यकता :

भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थेला खुप मोठा इतिहास आहे. स्वतंत्र भारतात महात्मा गांधीजीची "ग्रामस्वराज्याची" कल्पना केंद्रबिंदु मानुन स्थानिक स्वराज्या संस्थाची स्थापना करण्यात आली. ग्रामीण भारताच्या विकासात स्थानिक स्वराज्य संस्थाचे मोलाचे योगदान आहे. पंचायतराजच्या त्रीस्थरीय व्यवस्थेत जिल्हा परिषदेस अनण्य साधारण महत्व आहे. शासनाने मोठया प्रमाणात विकासाची जबाबदारी जिल्हा परिषदेवर टाकली आहे. म्हणुन त्या कार्यातील परभणी जिल्हा परिषदेची भुमिका व महिला नेतृत्वाचे योगदान कशा प्रकारचे आहे याचा अभ्यास करण्या करीता प्रस्तुत संशोधनाची आवश्यक्ता आहे.

महाराष्ट्र अधिनियम २०११ मुळे स्थानिक स्वराज्य संस्थात महिलांना नेतृत्वाची खुप मोठी संधी निर्मान झाल्याने ग्रामीण विकासात त्यांची भुमीका महत्वाची आहे. म्हणुन महाराष्ट्र अधिनियम २०११ ने परभणी जिल्हा परिषदेतील महिला नेतृत्वावर काय परीणाम झाला ? महिलांच्या राजकारणातील सहभागाने स्त्री-पुरुष यांच्यातील राजकारणाची, सत्तेची समीकरणे कशा प्रकारची आहेत ? महाराष्ट्र अधिनियम २०११ मुळे महिला नेतृत्वात बदल झाला काय ? सध्या राजकीय पक्षांचे महिला धोरण कसे आहे ? महिलांचा राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन कशा आहे ? परभणी जिल्हा परिषदेच्या निर्णय प्रक्रीयेतील महिलांची भुमीका कशी आहे ? महिलांचा राजकिय सहभाग वाढवण्यासाठी शासन काय प्रयत्न करत आहे ? या अनुषंगाने प्रस्तुत संशोधनाची आवश्यक्ता आहे.

संशोधनाची उदिष्टे :

१) परभणी जिल्हा परिषदेतील महिला नेतृत्वाचा अभ्यास करणे.

२) महाराष्ट्र अधिनियम २०११ मुळे महिला नेतृत्वाच्या राजकीय स्थितीमध्ये झालेला बदल जाणुन घेणे.

३) महिलांच्या विकासा संदर्भातील शासकीय धोरणाचा अभ्यास करणे.

४) परभणी जिल्हा परिषदेतील महिला सदस्यांच्या समस्यांचा शोध घेणे.

५) महिला नेतृत्वाच्या राजकिय, सामाजीक व शैक्षणीक स्थितीचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतकृत्ये :

१) महाराष्ट्र अधिनियम २०११ मुळे परभणी जिल्हा परिषेदेमध्ये महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे.

२) वर्तमान काळात शासन महिला सबलीकरणासाठी सकारात्मक निर्णय घेत आहे.

३) महाराष्ट्र अधिनियम २०११ मुळे पंचायतराजमध्ये महिलांचा राजकीय सहभाग वाढला असला तरी त्यांच्या समोरील आव्हाने कमी झालेली नाहीत.

४) पंचायतराजमधील महिलांच्या वाढत्या सहभागा बरोबरच महिला पदाधिकाऱ्याच्या कारभारात पुरुषांचा हस्तक्षेप वाढला आहे.

५) महिलांच्या जिल्हा परिषदेमधील वाढत्या सहभागामुळे प्रशासनातील अकार्यक्षमता, अपारदर्शकता, भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी होत आहे.

संशोधन आराखडा :

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषनात्मक संशोधन आराखडयाची निवड करण्यात येणार आहे. कारण वर्णनात्मक संशोधन आराखडयाद्वारे संकलीत तथ्यांचे विश्लेषण व तुलना केली जाते. वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा मुख्य उदेश एखादया समस्येशी संबंधीत असलेल्या वास्तवीक तथ्यांच्या आधारे वर्णनात्मक विश्लेषण करणे हा होय.

संशोधन क्षेत्र :

महाराष्ट्र अधिनियम २०११ प्रस्तुत अध्ययनाचे क्षेत्र आहे. प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्र अधिनियम २०११ च्या अंमलबजावणीमुळे परभणी जिल्हा परिषदेतील महिलांच्या राजकीय सहभागात झालेल्या बदलाचा तसेच महिला नेतृत्वामुळे परभणी जिल्हा परिषद प्रशासनामध्ये होत असलेल्या बदलाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधन मर्यादा :

महाराष्ट्र अधिनियम २०११ ने स्थनिक स्वराज्य संस्थात महिलांसाठी ५० टक्के आरक्षणाची तरतुद केलेली आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेतील महिला नेतृत्वाला या अधिनियमामुळे मोठी संधी निमार्ण झालेली आहे. परंतु परभणी जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थाचा आवाका खुप मोठा असल्याने केवळ परभणी जिल्हा परिषदेतील महिला नेतृत्वाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

नमुना निवड :

प्रस्तुत संशोधन करत असंताना विषयाची व्याप्ती तसेच अभ्यासासाठी प्रमाण मानलेली उदिष्ट, गृहितकृत्ये आणि वैशिष्टये लक्षात घेता संपूर्ण समग्राचा अभ्यास न करता संशोधनासाठीच्या यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा अवलंब करुन संशोधन कार्य पुर्ण करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन :

सामाजीक शास्त्रामध्ये तथ्य सर्व सामान्य व्यक्तीना व उतरदात्याना विचारलेल्या प्रश्नांच्या प्रतिक्रीयाच्या नोंदी स्वरुपात असतात. हे लक्षात घेऊन प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहीती संकलीत करण्यासाठी प्राथमीक व दुय्यम तथ्य स्त्रोतांचा उपयोग केला जाणार आहे.

अ) प्राथमीक साधने :

परभणी जिल्हा परिषदेचे कार्यालयीन प्रकाशीत व अप्रकाशीत कागद पत्रे, अहवाल व संशोधन विषयाशी संबंधीत व्यक्तींकडून व पदाधीकारी यांच्या कडुन प्रत्यक्ष मुलाखत व प्रश्नावलीच्या साहयाने तथ्य संकलन करण्यात येईल.

ब) दुय्यम साधने :

प्राथमीक स्त्रोतांना अधिक पुष्टी देण्यासाठी दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतला जाईल. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकाशीत व अप्रकाशीत साहीत्य, पुस्तके, वर्तमानपत्रे, नियतकालीके व संदर्भ ग्रंथ तसेच वेबसाईट या साधनांचा वापर केला जाईल.

प्रकरणाची रुपरेषा :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील प्रमाणे प्रकरण नियोजन करण्यात आलेले आहे.

प्रकरण पहिले

प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाची निवड, संशोधन पुर्व साहित्याचा आढावा, संशोधनाची उदिष्टये, गृहितके, संशोधन पध्दतीचा आभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे

परभणी जिल्हयाची पार्श्वभुमी :

या प्रकरणात परभणी जिल्हयाची ऐतिहासीक, सामाजीक, राजकिय,आर्थिक व शैक्षणीक पार्श्वभुमीचा आभ्यास करण्यात येईल.

प्रकरण तिसरे

स्थानिक स्वराज्य संस्थाचा ऐतिहासीक आढावा व महत्व :

या प्रकरणात स्थानिक स्वराज्य संस्थेसंबंधीचे ऐतहासीक विवेचन, स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास, स्थानिक स्वराज्य संस्थेचे बदलते स्वरुप व महत्व या बाबीचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चौथे

परभणी जिल्हा परिषदेतील महिला नेतृत्व :

या प्रकरणात नेतृत्व संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करुन नेतृत्वाचे महत्व, परभणी जिल्हयातील महिला नेतृत्व, परभणी जिल्हा परिषदेतील त्यांची भुमिका व महिला नेतृत्वा समोरील आव्हाने या बाबीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

महाराष्ट्र अधिनियम २०११ महिलांचे स्थान व बदलते स्वरूप.

प्रस्तूत प्रकरणात महाराष्ट्र अधिनियम २०११ मुळे महिलांचे राजकारणातील सहभागीत्व, महाराष्ट्र अधिनियम २०११ पुर्विची महिलांची राजकारणातील स्थिती व वर्तमानकाळात सत्ता स्थानात व राजकीय सहभागातील वास्तवीकतेचा अभ्यास करुन शासन धोरणाचे यश अपयश याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सहा

सारंश, निष्कर्ष व शिफारशी.

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन सारंश व प्रमुख निष्कर्ष मांडली जातील. स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांच्या सहभागा करीता पुरक शिफारसी करण्यात येतील.

संदर्भ सूची :-

१. गाडगीळ मालती, **समानतेच्या वाटेवर,दास्ताने** रामचंद्र आणि कं.,पुणे, १९९३.

२. खेकाळे ना.रा., **राजकीय नेतृत्व, श्री** मंगेश प्रकाशन, नागपुर, १९९९.

३. गवाणकर रोहिणी,मराठी **स्त्री शक्तीचे राजकारणी रुप,वितरण** ग्रंथावली, मुंबई, १९९६.

४. चौधरी कि.का.,(संपा.),महाराष्ट्र **राज्य गॅझेटीअर परभणी जिल्हा,** महाराष्ट्र शासन, १९८८.

५. दाते/एखेळीकर, **भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था,** शारदा प्रकाशन,नांदेड.

६. धारुरकर सुभद्रा, **हैद्राबाद मुक्ती संग्रामात महिलांचा सहभाग,** साई प्रकाशन, औरंगाबाद,२००१.

७. पाटील भारती, **स्त्रीयांचा सत्तेतील सहभाग:सबलीकरण प्रक्रियेतील महत्वाचा टप्पा,** शास्त्रीय समाजवादाचे खुले व्यासपीठ, इचलकरंजी, १९९४

८. भोळे भा.ल., **भारताचेशासन आणि राजकारण,** पायल प्रकाशन, नागपुर, १९७४.

९. डॉ.महिपाल ,महाराष्ट्र **पंचायतराज कानून,** अलोचना प्रकाशन, पुणे, १९९४.

१०. विभुते भालबा, **पंचायतराज व्यवस्था,मनोविकास** प्रकाशन,मुंबई,२००१.

११. शर्मा अशोक, **भारत में स्थानिक प्रशासन,** आर.बी.एस.ए.पब्लिशर्स, जयपुर, २००५.

१२. विदयुत भागवत, **भारतातील समकालीन कळीचे प्रश्न,** स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, २००१.

१३. पुरोहित पंकज पाल,आरक्षण **सामाजिक,राजनैतिक एवं महिला परिदृश्य,** रितु पब्लिकेशन्स,जयपुर,२०१४.

१४. गाठाळ एस.एस.,भारतीय **इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन,** कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१३.

१५. डॉ. बोधनकर सुधीर, **सामाजिक संशोधन पध्दती,** साईनाथ प्रकाशन, नागपुर, २००३.

१६. गाडे सोपान(संपा.), **महाराष्ट्रातील महिलाराज,** आविष्कार प्रकाशन, पुणे, २००८.

१७. शर्मा नीता, **महिला व बाल कानुन,** अर्जून पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २०१४.

१८. साठे निर्मला, **पंचायतराज आणि आपण,** अलोचना प्रकाशन, पुणे.

१९. **महाराष्ट्र अधिनियम-२०११,** महाराष्ट्र शासन.

२०. **महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती अधिनियम-१९६१,** महाराष्ट्र शासन.

२१. डॉ.मोहिनी कडू, भारतीय **राजकारणातील स्त्रिया,विजय** प्रकाशन, नागपुर, २००८.

२२. हरि मोहन धावन व अरुन कुमार(संपा.), **महिला आरक्षण एवं भारतीय समाज,** रावत पब्लिकेशन, २०११.

२३. वडेरा किरण, ग्रामीण **महिला सशक्तिकरण,** सागे पब्लिकेशन, २०१७.

संशोधक
गणेश मारोती कचरे
एम.ए.एम,फिल.सेट (राज्यशास्त्र)

मार्गदर्शक
डॉ.साहेब राठोड
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
स्व.नितीन कला व विज्ञान महाविद्यालय, पाथरी जी.परभणी